# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

**UGC CARE LISTED JOURNAL**

**October 2021**

**Special Issue,Volume-III**

**On**

## *SUSTAINABLE DEVELOPMENT AND ENVIRONMENTAL ISSUES*

**Chief Editor**
**Dr. Nanasaheb Suryawanshi**
Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

**Executive Editor**
**Dr. Y. M. Chavan**
I/C Principal
Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad.

**Co-Editor**
**Prof. R. S. Kadam**
Head Dept. of Geography
Vice Principal / IQAC Coordinator

**Editorial Board**
Assi. Prof. S. B. Dongle
Assi. Prof. Y. B. Badame
Assi. Prof. P. A. Hulwan
Assi. Prof. D. T. Hujare
Assi. Prof. A. V. Patole

**Published by-** Dr. Y. M. Chavan, I/C Principal, Sahakarbhushan S. K. Patil College, Kurundwad.

*The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.*

© All rights reserved with the Editors Price:Rs.1000/-



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 51 | सत्यशोधक – रामचंद्र बाबाजी जाधव उर्फ दासराम<br>प्रा. प्रफुल एम. राजूरवाडे | 220-221 |
| 52 | प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राच्या गुणवत्तेत डिजिटल शाळांची भूमिका<br>अविनाश कुंभार | 222-224 |
| 53 | गणिताच्या गुणवत्ता विकासात गणितपेटीचे महत्त्व<br>पांडुरंग कुंभार | 225-226 |
| 54 | शालेय पोषण आहार योजनेची शाळेच्या गुणवत्ता विकासात भूमिका<br>रामचंद्र तुकाराम जाधव | 227-229 |
| 55 | शिक्षकांचा ताणतणाव आणि मानसिक आरोग्य<br>राम ढाले | 230-232 |
| 56 | भूगोल विषयातील गुणवत्तावाढीसाठी अध्यायात लर्न जिऑग्राफी आपच्या परिणामकारकतेचा अभ्यास<br>दत्तात्रय मस्के | 233-235 |
| 57 | जनसंख्या वृद्धि एवं नगरीकरण की प्रवृति : रोहतास जिला के सन्दगर्भ में एक भौगोलिक अध्यखयन<br>आशुतोष कुमार | 236-241 |
| 58 | प्राथमिकस्तरावरील इयत्ता सातवी वर्गाच्या आकारिक मूल्यमापन पध्दतीतील पुस्तकासह चाचणीच्या अंमलबजावणीतयेणाऱ्या समस्यांचा अभ्यास<br>श्री. मंगेश मोरे | 242-244 |
| 59 | इयत्ता 7 वी तील विद्यार्थ्यांच्यागणित ज्ञानरचनावादीअध्यापनाच्याअंमलबजावणीचाव परिणामकारकतेचाअभ्यास<br>अण्णा बाबू दिक्षित | 245-247 |
| 60 | ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापनामध्ये प्राथमिक शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेऊन ते दूर करण्यासाठी विकसित केलेल्या कृती कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास<br>डॉ. महादेव सदाशिव डिसले | 248-250 |
| 61 | धम्मके सन्दिर्भमें बी.आर. अंबेडकर की दार्शनिक विचारधारा<br>डॉ. शिवशंकर प्रसाद | 251-256 |
| 62 | जागतिक महामंदीच्या काळातील सरकारचे वित्तीयधोरणएक ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा. संदिप भैरू जाधव | 257-263 |
| 63 | ब्रिटिश सत्तेवर शेवटचा प्रहार करणारं 'भारत छोडो' आंदोलन<br>श्री.दत्तात्रय शिवाजी थोरात | 264-267 |




Scanned by CamScanner

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, October 2021, Special Issue, Volume-III
Sustainable Development and Environmental Issues

# जागतिक महामंदीच्या काळातील सरकारचे वित्तीयधोरण : एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. संदिप भैरू जाधव**

सहाय्यक प्राध्यापक, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा.

**गोषवारा:-**

ऑक्टोबर,१९२९मध्येअमेरिकेत सुरु झालेली जागतिक महामंदीसंपूर्ण जगभर पसरली. जागतिक महामंदी मुळे वस्तूंच्या किंमती घसरून लोकांना पराकाष्टेच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. या जागतिकमहामंदीचे परिणाम सर्वच क्षेत्रावर कमी-अधिक प्रमाणात झाले. याकाळात भारतात फारसा औद्योगिक विकास झाला नसल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी उत्पादनावर अवलंबून होती. अर्थात भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेवर या महामंदीचे दूरगामी परिणाम झाले.

जागतिक महामंदीच्या विकट आर्थिक परिस्थितीतून भारताला बाहेर काढण्यासाठी सरकारने कोणत्या आर्थिक धोरणांचा विशेषकरून कृषीच्या संदर्भात अवलंब केला याचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा महत्वाचा उद्देश आहे.

**प्रस्तावना:-**

ऑक्टोबर,१९२९मध्ये अमेरिकन शेअर मार्केट कोसळल्यानंतर जागतिक महामंदीची सुरुवात झाली. जगभरातील सर्व राष्ट्रे एकमेकांशी आंतरराष्ट्रीय संबंधाने जोडली गेली होती. शिवाय जागतिक अर्थव्यवस्था फारशी सुस्थिर नव्हती. त्यामुळे अमेरिकेतील महामंदीची लाट युरोपभर व त्यानंतर संपूर्ण जगभर पसरली. महामंदीमुळे वस्तूंच्या किंमती घसरून उत्पादन कमी झाले आणि बेरोजगारी वाढली. लोकांना पराकाष्टेच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. या महामंदीतून जगाला बाहेर पडण्यासाठी दुसऱ्या महायुद्धापर्यंतचा काळ जावा लागला.

भारत अगोदरच जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडला गेला होता. शिवाय भारत ही इंग्लंडची एक वसाहत असल्यामुळे या महामंदीपासून भारत फार काळ दूर राहू शकला नाही. भारत जागतिक बाजारपेठेशी जोडला गेल्यामुळेभारताची आयात-निर्यात अवलंबून असलेल्या देशात आलेल्या महामंदीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणे अपरिहार्य होते.भारताच्या निर्यातीपैकी ४२% निर्यात असलेल्या इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या देशांना जागतिक महामंदीचा धोका जास्त जाणवलेला होता. त्याचे पडसाद भारतात लवकरच उमटले.याकाळातभारतातफारसा औद्योगिक विकास झाला नसल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था ही कृषी उत्पादनावर अवलंबून होती. त्यामुळे भारतातून कच्च्या शेतमालाची निर्यात होत होती तर पक्क्या मालाची आयात होत होती. भारताची अर्थव्यवस्था हि निर्यात वाढव्यावर अवलंबून होती.

भारतातजागतिक महामंदीचीसुरुवातझाल्यानंतरभारताच्याआयात- निर्यातव्यापारामध्येअसमतोल निर्माण होऊन भारताचा व्यापारतोल प्रतिकूल बनून उत्पन्नामध्ये तुटनिर्माण होऊ लागली. जागतिकमहामंदीमुळे निर्माण झालेल्या या वित्तीयअडचणींवर मात करण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर खर्च कपातकरून नवीन करांची आकारणी केली. महत्वाची बाब म्हणजे भारत सरकारनेमोठमोठे प्रकल्प विकासासाठीकर्जे उभारली नाहीत कि, ज्यामुळे जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती होऊन महामंदीतून बाहेर पडण्यासाठी त्याचे पंपासारखे सहाय्य झाले असते.

**वित्तीयधोरण :- Fiscal Policy**

शासनाला आपले आर्थिक उद्देश पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती शासकीय उत्पन्नाची आणि खर्चाची पातळी गाठता यावी म्हणून उपलब्ध साधनांचा योग्य वापर करण्याचे सरकारी धोरण म्हणजे वित्तीय धोरण किंवा राजकोषीय धोरण होय.[१]शासनाला वित्तीय धोरणाचे उद्देश प्राप्त करण्यासाठी कर आकारणे, खर्च करणे, कर्ज उभारणे, कर्ज देणे आणि खरेदी व विक्री व्यवहार करणे या वित्तीय साधनांचा संयुक्तिक व विवेकपूर्ण वापर करावा लागतो.[२]



Scanned by CamScanner

उत्पादनाचे परिणाम, रोजगार व किंमती यांच्यामध्ये विपरीत फेरबदल होऊ नयेत व अर्थव्यवस्थेत आर्थिक स्थैर्य साधावे हा उद्देश साधण्यासाठी अर्थव्यवस्थेतील उपलब्ध उत्पादनक्षमता आणि एकूण प्रभावी मागणी यामध्ये संतुलन राखणे आवश्यक असते.[३]हा समतोल साधावा म्हणून एकूण मागणीच्या घटकांपैकी एकाचे किंवा अनेकांचे नियमन करावे लागते. निरनिराळे आर्थिक उद्देश गाठण्यासाठी शासनास वेगवेगळी वित्तीय साधने उपलब्ध असली तरी विविध उद्देशांचे मिश्रण केल्यास ते यशस्वी रितीने साधावे म्हणून ही वेगवेगळी वित्तीय साधने कशी हाताळावयाची हाच वित्तीय नितीपुढील मुख्य प्रश्न असतो.[४]

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतात वापरलेली वित्तीय निती अनिर्बंध अर्थव्यवस्थेच्या तत्वावर आधारलेली होती. परकीयांचे आक्रमण व बेबंदशाही यापासून रयतेचे रक्षण करणे एवढीच सरकारची जबाबदारी आहे असे प्रथमदर्शनीब्रिटीश राज्यकर्तेमानतहोते. साहजिकच ब्रिटीश काळात सामाजिक सेवा आणि आर्थिक विकास याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले नाही. अर्थसंकल्पात संतुलन राखणे व अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने प्रभावशून्य असे वित्तीय धोरण चालू ठेवणे एवढीच जबाबदारी ब्रिटीश राज्यकर्ते सांभाळीत असत.

जागतिक महामंदीमुळेभारतातीलनिर्यातीच्या किंमती कमी झाल्यामुळे शेती उत्पादनाच्या किंमती उतरल्या. त्यामुळे सरकारच्या उत्पन्नामध्ये संथपणे कमतरता निर्माणहोऊनसरकारला आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यामुळे सरकारने दंडात्मक उपाययोजनेद्वारे जास्तीचा अधिभार लावून करांचे प्रमाण वाढविले आणि जमीन महसूल सक्तीनेवसूलकरून उत्पन्नामध्ये स्थिरता आणण्याचा प्रयत्न केला.[५]त्याचवेळी सरकारने खर्चामध्ये कपात करून तसेच चलन संकोचनाचे धोरण स्विकारून जागतिक महामंदीवर मात करण्याचा प्रयत्न केला. जागतिक महामंदीने निर्माण केलेल्या सर्वच क्षेत्रातील अडचणीतून मार्ग काढत अर्थसंकल्पीय पत राखण्याचा सरकारने प्रयत्न केला.[६]

जागतिक महामंदीमुळे अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण झालेली आर्थिक तुट, वित्तीय आकुंचन आणि राष्ट्राच्या आर्थिक वेदना यावर मात करून अर्थसंकल्पीय समतोल राखण्यासाठी जवळपास जगभरातील सर्वच राष्ट्रांना काहीतरी आर्थिक उपाययोजना करणे भाग पडले. भारत सरकारने या वित्तीय आकुंचनातून बाहेर पडण्यासाठी शासनाचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न केला.[७]मंदीतून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी सरकारच्या सार्वजनिक खर्चात कपात करण्याचा उपाय घातक आहे. मंदीमुळे निर्माण झालेल्या उदासिनआणि विकट आर्थिक परिस्थितीतून अर्थव्यवस्थेलाबाहेर काढून पुन्हा पूर्वपदावर आणण्यासाठी सरकारने त्याअनुषंगाने खर्च करणे आवश्यक आहे याची जाणीव जगभरातील सर्वच सरकारांना आधुनिक अर्थशास्त्रज्ञ जे. एम. केन्सने सन १९३६ मध्ये 'General Theory of Employment, Interest and Money'हा ग्रंथ प्रसिद्ध केल्यानंतर झाली.[८]परंतु त्यापूर्वीही जर्मनी, अमेरिका, जपान यासारख्या राष्ट्रांनी जागतिक महामंदीतून आपल्या अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी सार्वजनिक खर्चात कपात न करण्याच्या उपायांचा प्रत्यक्षात अवलंब केला होता.असे असले तरी जागतिक महामंदीतून बाहेर पडण्यासाठी भारतसरकारने खर्चात कपात केली आणिकरांमध्ये वाढ करून त्याअनुशांगाने आर्थिक बांधिलकीनिभावण्याचाप्रयत्न केला.यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जागतिक महामंदीने निर्माण केलेल्या आर्थिक संकटामध्ये भरच पडली.याशिवाय सरकारला भारतीय वित्त बाजारात स्पर्धक दिसत होते आणि या वित्तीय अडचणींवर मात करण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च करण्याऐवजी त्या रक्कमेचा वापर जुनी कर्जे परत करण्यासाठी केला. यासाठी सरकारने रोखे (bounds)आणि Treasury billsजारी केली.हे घटकदेखील सरकारला उदासिनकृती करण्यासाठी भाग पाडत होते. इथे लक्षात घेण्याजोगी महत्वाची बाब म्हणजे भारत सरकारने भारतात मोठमोठे प्रकल्प विकासासाठीकर्जे उभारली नाहीत कि, ज्यामुळे जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती होऊन महामंदीतून बाहेर पडण्यासाठी त्याचे पंपासारखे सहाय्य झाले असते.[९]

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला अगदी पहिल्या महायुद्धापर्यंत भारत सरकारला सार्वजनिक कर्ज घेण्याची फारशी गरज भासली नाही.पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला सरकारच्या चालू खात्यात वाढावा होता. परंतु पहिल्यामहायुद्धकाळात सरकारला लष्करावर व इतर गोष्टीवरमोठ्या प्रमाणावर खर्च झाल्याने सरकारच्या खर्चात व कर्जात तीव्र वाढ झाली.[१०]

**खर्चामध्ये कपात:-**

जागतिक महामंदीच्या काळात विशेषतः सन १९३०-३१ मध्ये केंद्र व प्रांत या दोन्ही सरकारांना वित्तीय अडचणींना सामोरे जावे लागले. उत्पन्न कमी झाल्यामुळेव्यवहारतोलामध्येपेचप्रसंग निर्माण झाला. गृहखर्च भागविण्यासाठी व्यापार वाढावा फार काळ पुरेसा न झाल्याने भांडवलाचा निचरा होऊ लागला.[११]कॉंग्रेसने सविनय



Scanned by CamScanner

कायदेभंग चळवळ सुरु केली आणि त्याचवेळीस्टर्लिंगमधील कर्जाला सुरुवातीलाच भारतालानकाराचा इशारा मिळाला. या राजकीय अशांततेमुळे व बिकट आर्थिक परिस्थितीमुळे भारताची आंतरराष्ट्रीय पत स्थिर राहिली नाही।[12]आणि लंडनमधील भारतीय सरकारच्या रोख्यावरील किंमत कमी-कमी होऊ लागली. सन १९३० मध्ये floatकर्ज घेण्यास भारत अपयशी झाला.[13]

भारत सरकारने किंमत घसरणीमुळे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी व तुट भरून काढण्यासाठी खर्च कपातीचे धोरण स्विकारले. मुलकी सेवेचादर्जा, निवृत्तीवेतन, गृहखर्च, कर्ज सुविधा यासारख्या कायम बांधिलकी असलेल्या गोष्टींची परिपूर्ती करणे प्राप्त परिस्थितीमध्ये सरकारला सोपे नव्हते.तत्काळ आणीबाणीचा प्रसंग म्हणून १०% पगार कपाती करूनही यामधील अंतरभरून काढणे सरकारला शक्य नव्हते. त्यामुळे सरकारने शैक्षणिक संस्थांची मदत, सार्वजनिक कामांवरील खर्च, शेती विकासाच्या प्रकल्पावरील व सार्वजनिक आरोग्यावरील खर्चात कपात केली.[14]

जागतिक महामंदीच्या काळात किंमत घसरणीमुळे निर्माणझालेल्या तुटीचा अर्थभरणा करण्यासाठी भारत सरकारने खर्च कपातीचे धोरण स्विकारले.परंतु आर्थिक आणीबाणीची परिस्थिती म्हणून १०% वेतनकपाती करूनही जागतिक महामंदीमुळे झालेली आर्थिक तुट भरून येणे शक्य नव्हते. शैक्षणिक संस्थांची मदत, सार्वजनिक कामांवरील खर्च, शेती विकासाचे प्रकल्प आणि सार्वजनिक आरोग्य यासारख्या गोष्टीवरील खर्च तावडतोब कमी करण्यात आला. वैद्यकीय सेवा आणि सार्वजनिक आरोग्य यासारख्या खर्चातही मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली.[15]

थोडक्यात मंदीच्याकाळातील अर्थसंकल्पामध्येअल्पावधीत समतोल साधण्याचा सरकारकडून प्रयत्न करण्यात आला. सन १९३०-३१ मध्ये सरकारचा एकत्रितपणे संपूर्ण महसूल हा २०७६ मिलियन रुपये होता. तर त्यावेळी सरकारचा संपूर्ण खर्च हा २३०४ मिलियन रुपये होता. तोच सन १९३२-३३ मध्ये एकत्रित संपूर्ण महसूल २०९८ मिलियन रुपये झाला. तर त्याचवेळी सरकारचासंपूर्ण खर्च हा २०९५ मिलियन रुपये झाला.म्हणजेच सरकारने जागतिक महामंदीचा सामना करण्यासाठी खर्चात वाढ करून सतर्क प्रयत्न करण्यापेक्षा पूर्वी चालू असलेल्या खर्चातही कपातकरून बाजारपेठेवरील किंमत नियंत्रणाकडे दुर्लक्ष केले.विरोधाभास म्हणजे ब्रिटीश सरकार भारतातील सार्वजनिक खर्चात कपात करीत होते. त्याचवेळी आपल्या मायदेशातील म्हणजे इंग्लंडमधील सरकारने सन १९३५ते १९३८ या काळात सार्वजनिक खर्च जवळपास ९७.६ टक्क्यांनी वाढविला होता.[16]

प्रांतीय सरकारांनी सार्वजनिक खर्चात जवळपास एकतृतींश कपात केली. सरकारने या सार्वजनिक खर्चात कपात केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकांची खरेदी क्षमता घटली. बहुतांशी युरोपियन देश खरेदी शक्ती वाढविण्यासाठी सार्वजनिक खर्च वाढवीत होते, त्यामुळे असंतुलित अंदाजपत्रक होत होती. परंतु भारत सरकारने जुन्या धोरणाप्रमाणे संतुलित अंदाजपत्रक राखण्याचा प्रयत्न केला आणि ते आपले प्रथम कर्तव्य मानले.[17]

जागतिक महामंदीमुळे करावी लागलेली आर्थिक कपात आणि प्रशासनातील विरोधांमुळे भारत सरकार जागतिक महामंदीशी सामना करू शकेल असे कोणतेही प्रमुख सार्वजनिक कार्याचे उपक्रम हाती घेऊ शकले नाही.[18]अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रूझवेल्टच्या नव अर्थनिती कार्यक्रमाचीतुलना करता भारत सरकारने जागतिक महामंदीशी लढण्यासाठी केलेले प्रयत्न क्वचितच दिसतील[19]

जागतिक महामंदीच्या बिकट आर्थिककाळात भारत सरकार सार्वजनिक कार्यावर गुंतवणूक करण्याऐवजी कर्जाची परतफेड करण्यासाठी पैशाची रक्कम उभा करीत होते.जलसिंचनासारख्या बाबींवर गुंतवणूक करून सरकारला चांगला परतावा मिळू शकत होता.[20]परंतु अशा गुंतवणुकीमध्येही कपात करून सरकार आपल्या जबाबदाऱ्या कमी करत होते. जागतिक महामंदीच्या काळात जलसिंचनावर गुंतवणूक करणे ही पहिली प्राथमिकता होती कि, ज्यामुळे लोकांचा रोजगार वाढून शेतीचा विकास झाला असता आणि लोकांचे उत्पन्न वाढून लोकांची खरेदीक्षमता वाढली असती.[21]परंतु सरकारने त्याकडेही दुर्लक्ष केले.

असाच एक सार्वजनिक कार्य विभागहोता कि, ज्या विभागाच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे करण्यात आली होती. ज्यामुळे रोजगारनिर्मिती होऊन अर्थव्यवस्थेला चालना मिळाली होती. पण महामंदीच्या काळातील खर्च कपातीच्या धोरणाचा या विभागालाही जोराचा झटका बसला.सन १९३०-३१ मध्ये १४४ मिलियन रुपये या विभागातून सार्वजनिक कार्यावर खर्च झाले, सन १९३१-३२ मध्ये १०८ मिलियन रुपये तर सन १९३३-३४ आणि १९३४-३५ मध्ये फक्त ९६ मिलियन रुपये सार्वजनिक कार्यावर खर्च झाले. पण तुलनेने कायदा आणि सुव्यवस्था ,राखण्याच्या नावाखाली पोलिस प्रशासनावरचा खर्च फारसा कमी झाला नाही, ज्यामुळे Steel Frameच्या कवचातून बाहेर पडून महामंदीचा सामना करणे सरकारला शक्य झाले नाही.[22]



Scanned by CamScanner

सार्वजनिक प्रकल्प विकासातील शासनाच्या गुंतवणुकीमुळे रोजगार वाढून आर्थिक वाढीचा वेग वाढतो. पण भारतसरकारच्या खर्चाच्या आकुंचनामुळे आर्थिक मंदीच्या काळात सर्वत्र बेरोजगारी व गरिबी पसरली.[23]

**करामध्ये वाढ:-**

जागतिक महामंदीने आलेल्या याआर्थिक संकटावर मात करण्यासाठी शासनाने खर्च कपातीबरोबरच अतिरिक्त करांचा मार्ग अवलंबिला.जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी सन १९३० मध्ये सरकारला काहीबाबतीत नवे धोरण स्वीकारावे लागले व नवे करही लावावे लागले.[24]थोडक्यातसन १९३०-३१ च्या जमाखर्चात ५५७ लाख रुपयाची तुट भरून काढावयाची असून ही तुट काटकसर व नवे कर लादून भरून काढण्याचे सरकारी धोरणअसल्याचे सर जॉर्ज श्युस्टर याचे म्हणणे होते.[25]

२९ सप्टेंबर १९३१ रोजी भारतसचिव सॅम्युअल होअर(Samuel Hoare), वित्तीय सचिव जॉर्ज श्युस्टर यांनी कायदेमंडळात वाढविलेले कर आणि कमी केलेल्या खर्चासह पुरवणी अर्थसंकल्प सादर केला. करांच्या अनुशंगाने निर्यातीवरील सीमाशुल्क वगळता सर्व अस्तित्वात असलेल्या विद्यमान करावर २५% अधिभार आकारला.[26]रेशीमाच्या वस्तू, रेशीम धागे, तपकिरी साखर, बुटाचे जोडे, कापूर आणि इलेक्ट्रॉनिक बल्ब यावरील विद्यमान करात वाढ केली. या सर्व बाबतीत वाढलेल्या करावर अधिभार लावला. यंत्रसामुग्रीव रंगावर१०% आयात कर आकारला आणि कच्या कापसाच्या प्रत्येक गासाड्यावर५ आणा करआकारला. पोस्ट कार्ड व पोस्ट पत्रावर ही कराचे प्रमाण वाढविले. रुपयाला जवळपास २ पैसे ते ४ पैसे कराचे प्रमाण वाढले.याचबरोबरसरकारने परदेशी आयात कापडावर १५% व बिगर ब्रिटीश कापडावर २०% आयात जकात आकारली. परदेशी आयात साखरेवर व चांदीच्या आयातीवर जकात कर वाढविले, तर तांदळाच्या निर्यातीवरील जकात कर कमी करण्यात आला. त्याचबरोबर प्राप्तीकरात वाढ करण्यात आली.[27]मिठावरील आकारातही वाढकरण्यात आली.

**जमीन महसूलाचापेचप्रसंग:-**

जागतिक महामंदीच्याकाळात औद्योगिक क्षेत्रापेक्षा कृषिक्षेत्राची अर्थव्यवस्था जास्त प्रभावित झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना कमालीचा त्रास सहन करावा लागला. शेती उत्पादनाच्या किंमती अचानक कमी झाल्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न ५०% ते ६०% ने कमी झाले. पण त्यांची खर्चाची पातळी जवळपास पूर्वीप्रमाणेच राहिली.बंगाल प्रांतातील व्यापारी पिकांची एकूण वार्षिक सरासरी किंमत सन १९२०-२१ ते सन १९२९-३० या काळात ७२.४ करोड रुपये होती. ती सन १९३२-३३ मध्ये ३२.७ करोड रुपयापार्यंत खाली आली. त्याचवेळी वरील काळात सरकारच्या वित्तविषयक जबाबदाऱ्या२७.९ कोटी रुपयावरून २८.३ कोटी रुपयापर्यंत वाढल्या.[28]यावरून बंगालमधील शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेची वस्तुतः कल्पना येते.हीच परिस्थिती भारताच्या इतर भागाची होती. जागतिक महामंदीच्या काळात भारतातील अनेक शेतकरी आपल्या भूतकाळाच्या पुंजीवर राहिले आणि सरकारचा महसूल, खंड तसेच कर्जावरील व्याज भरण्यासाठी आपल्याजवळचे दागिने आणि बऱ्याचवेळा जनावरे विकली.याचा परिणाम म्हणजे भारतातील ग्रामीण कर्जबाजारीपणाचा बोजा वाढून महामंदीच्या काळात तो जवळपास दुप्पट झाला.[29]

कर्जाच्या दबावाखालून सहजपणे बाहेर येण्यासाठी बहुतांशी पाश्चात्य देशातील सरकारांनी शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य पुरविले. त्याचवेळी जागतिक महामंदीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक दबावातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी क्रांतिकारी कृषी उपाययोजना स्विकारल्या.[30]भारतामध्ये मात्र शेतकरी वर्गाला जागतिक महामंदीच्या बिकट आर्थिक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी सरकारने फारसे प्रयत्न केले नाहीत.याकाळात सरकारकडून शेतकऱ्यांनाफारच थोडी सारासूट मिळाली आणि सरकारी अधिकारी आत्मविश्वासाने सांगत होते कि, सारासुटीला कारणच नाही.[31]

वस्तुतः मंदीची परिस्थिती ही किंमतीतील घसरणीमुळे तात्पुरती नव्हती. तर त्यास दीर्घकाळ किंमतीतील घसरणीला तोंड द्यावे लागले. याची जाणीव सन १९३३ नंतर ब्रिटीश प्रशासकांना झाली. जुन्या महसूल पद्धतीनुसार जमीनमहसूल वसुली करताना बऱ्याच अडचणी येऊ लागल्या. लोकांच्यातील निष्ठा फारच तुरळक प्रमाणात दिसू लागल्या आणि अनेक ठिकाणी सारावसुलीसाठी जबरदस्तीचे धोरण स्वीकारण्यात आले. शेतकरी बऱ्याच कष्टाने महसूल भरू लागले. प्रसंगी सोने चांदी विकून(distress gold) महसुलाची भरणा करू लागले.[32]बऱ्याच प्रांतात जमीनमहसुलात सुधारणा करण्यात आल्या. पण बहुतांशी त्या फोल ठरल्या. शासनाने नवीन धोरण किंवा नवीन वित्तीय मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला नाही. सन १९३० मध्ये असलेला महसूलच सातत्याने वसूल करण्याचा प्रयत्न केला. जमीनमहसूल धोरणात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला नाही.[33]

जागतिक महामंदीला तोंड देण्यासाठी भारत सरकारने आपल्या सार्वजनिक खर्चात कपात करून आणिकरांमध्ये वाढ करून त्याअनुशंगाने आर्थिक बांधिलकीजपण्याचाप्रयत्न केला. कर्जाच्या आधाराशिवाय अर्थसंकल्प समतोल ठेवणे



Scanned by CamScanner

हे भारत सरकारचे याकाळातील प्रमुख तत्व होते आणि या तत्वाचे पालन सरकारने सातत्याने केले.जगभरातील सर्व राष्ट्रे मंदीतून बाहेर पडण्यासाठी नवनवीन सार्वजनिक कामे हाती घेऊन आपल्या खर्चामध्ये वाढ करीत होती. त्यावेळी भारत सरकारने खर्चामध्ये कपात व करांमध्ये वाढ केली.त्यामुळे भारतातील जागतिक महामंदीची तीव्रता कमी होण्याऐवजी त्यामध्ये अप्रत्यक्षपणे भरच पडली.

**समारोप:-**

जागतिक महामंदीचीसुरुवातझाल्यामुळेभारतीयनिर्यातवस्तूंच्याकिंमती कमी होऊनभारतातील अंतर्गत किंमतींमध्ये घसरण झाली आणिशेती उत्पादनाच्या किंमती उतरल्या. किंमतीउतरल्याचा परिणाम जनसामान्यांबरोबरच सरकारवरही होऊन सरकारच्या उत्पन्नामध्ये तुटनिर्माण होऊ लागली. सरकारने ही तुट भरून काढण्यासाठीदंडात्मक उपाययोजनेद्वारे जास्तीचा अधिभार लावून करांचे प्रमाण वाढविले आणि जमीन महसूल सक्तीने वसूल करून उत्पन्नामध्ये स्थिरता आणण्याचा प्रयत्न केला. जागतिक महामंदीच्या काळामध्ये ब्रिटिशांनी भारतातील काही आर्थिक धोरणांमध्ये बदल केला असला तरी बहुतांशी पूर्वीचीच धोरणे चालू ठेवली. त्यामुळे शेतकऱ्यांच्यावर त्याचा घातक परिणाम झाला. 'किंमत निर्धारण'सारख्या प्रभावी उपायांचा अवलंब सरकारने केला नाही. आयात-निर्यातीमध्ये खुले व्यापारी धोरण पूर्वीप्रमाणेच चालू ठेवले. सरकारकडून महसुल वसुलीमध्ये फारश्या सवलती दिल्या गेल्या नाहीत, उलट त्याची वसुली काटेकोरपणे करण्यात आली. केंद्रीय किंवा प्रांतीय सरकारने शेतकऱ्यांची कार्यक्षमता व रोजगार वाढेल अशी कोणतीही धोरणे विकसित केली नाहीत.

जागतिक महामंदीमुळे अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण झालेली आर्थिक तुट आणि वित्तीय आकुंचनातून बाहेर पडण्यासाठी भारत सरकारने खर्चात कपात केली आणिकरांमध्ये वाढ केली. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक संकटामध्ये भरच पडली.याशिवाय वित्तीय अडचणींवर मात करण्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च करण्याऐवजी त्या रक्कमेचा वापर जुनी कर्जे परत करण्यासाठी केला. जागतिक महामंदीने निर्माण केलेल्या सर्वच क्षेत्रातील अडचणीतून मार्ग काढत अर्थसंकल्पीय पत राखण्याचा सरकारने प्रयत्न केला. महत्वाची बाब म्हणजे भारत सरकारने भारतात मोठमोठे प्रकल्प विकासासाठी कर्जे उभारली नाहीत कि, ज्यामुळे जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती होऊन महामंदीतून बाहेर पडण्यासाठी त्याचे पंपासारखे सहाय्य झाले असते. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रूझवेल्टच्या नव अर्थनिती कार्यक्रमाची तुलना करता भारत सरकारने जागतिक महामंदीशी लढण्यासाठी केलेले प्रयत्न क्वचितच दिसतील.

भारतातजागतिक महामंदीची सुरुवात झाल्या नंतर भारताच्या आयात- निर्यात व्यापारा मध्ये असमतोल निर्माण होऊन भारताचा व्यापारतोल प्रतिकूल बनला. त्यामुळे सरकारच्या आर्थिक अडचणींमध्ये भर पडून उत्पन्नामध्ये तुटनिर्माण होऊ लागली. सरकारने ही तुट भरून काढण्यासाठीदंडात्मक उपाययोजनेद्वारे जास्तीचा अधिभार लावून करांचे प्रमाण वाढविले आणि जमीन महसूल सक्तीने वसूल करून उत्पन्नामध्ये स्थिरता आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जागतिक महामंदीने भारतीय अर्थव्यवस्थे मध्ये निर्माण केलेल्या आर्थिक संकटामध्ये भरच पडली. त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर अनेक दूरगामी परिणाम झाले.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

१. पाटील (डॉ.)जे. एफ.(संपादक), सार्वजनिक अर्थकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर,२०११,पृ. २१०.

२. Jhingan M.L.,Macro Economics Theory, Vrinda Publications Ltd, Delhi, 2004, Page No. 660-64.

३.Seth M.L.,Macro Economics,Lakshmi Narain Agarwal Educational Publishers, Agra, 2004,Page No. 508-509.

४. Ibid,Page No. 508-509.

५.Manikumar K. A., A Colonial Economy in the Great Depression Madras(1929-1937), Orient Longman Private Limited, Chennai, 2003, Page No. 96.

६.Ibid, Page No. 96.

७.RothermundDietmer, The Indian Economy under British Rule and other Essays, Manohar Publications, New Delhi, 1983, Page No.159.



Scanned by CamScanner

Ibid, Page No.152
Ibid,Page No.153.
१०.Government of India, Finance Department, File No. 21(10)-F1938.
११.KumarDharma, The Cambridge Economic History of India, Volume II, Orient Blackswan Private Limited, New Delhi, 1983,Page No. 941.
१२.Thomas P. J., The Growth of Federal Finance in India, being a survey of India's public finances of from 1833 to 1939, Humphrey Milford, Oxford University Press, London,1939, Page No. 358
१३.KumarDharma, Op-Cit,Page No. 941.
१४.RothermundDietmer, Op-Cit, Page No.159.
१५.Ibid,Page No.159.
१६.Phillips G. A., Maddock R.T., The Growth of the British Economy 1918-1968, George Allen & Unwin Ltd., London,1973, Page No. 151.
१७.Thomas P. J., Op-Cit, Page No. 363
१८.Tomlinson B. R., The Political Economy of the Raj 1914-1947 The Economics of Decolonization in India, The Macmillan Press LTD, London, 1979, Page No. 90.
१९.Singh Kanti, The Great Depression and Agrarian Economy, Mittal Publications, Delhi, 1987, Page No. 58.
२०.Manikumar K. A., Op-Cit, Page No. 116.
२१.Rothermund Dietmer, Op-Cit, Page No.168.
४४.*Ibid, Page No.169-170.*
२३.*Manikumar K. A.*, Op-Cit, Page No. 116.
२४.विजयी मराठा,पुणे, १० मार्च १९३०.
२५.विजयी मराठा,पुणे, १० मार्च १९३०.
२६.Manikumar K. A., Op-Cit, Page No. 100.
२७.विजयी मराठा,पुणे, १० मार्च १९३०.Thomas P. J., Op-Cit, Page No. 361-62.
२८.*Singh Kanti, Op-Cit, Page No. 55.*
२९.Ibid, Page No. 42.
३०.*Rothermund* Dietmar,The Global Impact of the Great Depression in 1929-1939, *Routledge, London, 1996, Page No. 57.*
३१.Sir Gorge Schuster, Private work and Public *Causes, A personal record,1881-* 1978, Cambridge, 1979.



Scanned by CamScanner